

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दरात पाठविण्याचा पोस्ट परवाना – Regd. NSK / 231 / 2012-2014
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस नाशिक G.P.O. येथे पोस्टींग केला जातो.

**किंमत १ रुपया**

अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिंद क्षात्रं शापादपि शरादपि ।।

# चित्तपावन मित्र

वर्ष ३५ वे | अंक ५ वा | १० जुलै २०१४

## ।। निमंत्रण ।।

### चित्तपावन उद्योजक मंच

# सहावा वर्धापन दिन

● दिनांक व वेळ ●

**रविवार दि. १७ ऑगस्ट २०१४ सकाळी ९ ते सायं. ६**

● स्थळ ●

**कुर्तकोटी शंकराचार्य हॉल,**
**शंकराचार्य न्यास, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक**

● निमंत्रक ●

**अध्यक्ष, चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक**

## चित्तपावन उद्योजक मंच

# सहावा वर्धापन दिन

रविवार दि. १७ ऑगस्ट २०१४ सकाळी ९ ते सायं. ६

**स्थळ :** कुर्तकोटी शंकराचार्य हॉल, शंकराचार्य न्यास, जुना गंगापूर नाका, गंगापूर रोड, नाशिक

## यशस्वी चित्तपावन उद्योग गाथा

सकाळी ८.४५ ते ९.३० – नोंदणी, अल्पोपहार, प्रतिनिधींमधील संवाद

सकाळी ९.४५ ते १०.०० – उद्घाटन सत्र

**● प्रथम सत्र**

सकाळी १०.०० ते ११.०० – बीज भाषण – डॉ. अजित रानडे,
ज्येष्ठ अर्थतज्ञ व आदित्य बिर्ला समुहाचे मुख्य अर्थतज्ञ

**● दुसरे सत्र**

सकाळी ११.०० ते दुपारी १२.४५ – बिझनेस नेटवर्किंग
डॉ. अजित मराठे व श्री. गिरीश टिळक

दुपारी १२.४५ ते १.४५ – भोजन (सर्व उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था केली आहे)

दुपारी १.५० ते २.०० श्री. प्रमोद लेले – चित्तपावन फाऊंडेशन उपक्रमांची माहिती

**● तिसरे सत्र**

दुपारी २.०० ते ३.३० – आगळ्या वेगळ्या क्षेत्रातील यशस्वी उद्योजक
श्री. विजय आठवले – शोगिनी टेक्नोआर्टस् प्रा. लि., पुणे
श्री. तुषार मेहेंदळे –
इलेक्ट्रोमेक मटेरियल हँडलिंग सिस्टम्स प्रा. लि., पुणे
मुलाखतकार – श्री. सुधीर जोगळेकर व डॉ. अजित मराठे

**● चतुर्थ सत्र**

दुपारी ३.३० ते सायं. ५.०० – यशस्वी उद्योजिका
सौ. रजनी दांडेकर – कॅमलिन उद्योग समूह, मुंबई
सौ. मोहिनी केळकर – ग्राइंड मास्टर्स प्रा. लि., औरंगाबाद
सत्रसूत्रधार – श्री. रामभाऊ भोगले, निर्लेप उद्योग समूह व
महा. चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष

**✻ कार्यक्रम समाप्ती ✻**

**निमंत्रक :** अध्यक्ष, चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक

# नाशिक चित्तपावन उद्योजक मंच (NASCUM) चा सहावा वर्धापन दिन

नाशिक चित्तपावन उद्योजक मंच (नॅसकम) चा सहावा वर्धापन दिन १७ ऑगस्ट २०१४ रोजी साजरा करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणेच या कार्यक्रमाची तयारी सुरू झाली आहे. या वर्षी महाराष्ट्राबाहेरील यशस्वी चित्तपावन उद्योजकांना आमंत्रित करण्यात येणार आहे. तसेच आपल्या व्यवसायात स्वतःचा ठसा उमटवणारे चित्तपावन आणि स्वतःचे उद्योग साम्राज्य उभे करणारे चित्तपावन यांनाही आमंत्रित करण्यात येणार आहे. यामधील काहींची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे –

## श्री. विजय आठवले –

शोगिनी टेक्नोक्रॅट्स् प्रा.लि.

श्री. विजय आठवले यांचे सर्व शिक्षण पुणे येथे झाले. नूतन मराठी विद्यालयातून एस्.एस्.सी. झाल्यावर त्यांनी वाडिया कॉलेजमधून १९६४ मध्ये मेकॅनिकल ड्राफ्टस्मन चा डिप्लोमा केला. त्यानंतर १९६४ ते १९७६ पर्यंत त्यांनी ठाणे व पुणे येथे वेगवेगळया नोकऱ्या केल्या. त्यानंतर तीन वर्षे पुणे येथील इलेक्ट्रोटेक मॅन्युफॅक्चरिंग कंपनी येथे मॅनेजर म्हणून काम केले. १९७९ साली पुण्यातच पत्नी सौ विभावरी यांच्या मदतीने त्यांनी शोगिनी ची सुरुवात केली. नवी पेठ येथील एका भाडयाच्या छोटयाशा खोलीत त्यांनी ही सुरवात केली. प्रिंटेड सर्किट बोर्ड चे लेआउट आर्टवर्क आणि फोटोग्राफी असं त्यांच्या कामाचं स्वरूप होतं. १९८१ साली भाऊ विनायक त्यांच्या बरोबर काम करू लागला. याच छोटया स्वरूपातील उद्योगाचे रूपांतर आज एका आधुनिक आय.एस्.ओ ९००१ (२००८) प्रमाणित कंपनीत झाले आहे. मुंबई–बंगलोर हायवेजवळ १७ एकर प्लॉटवर आज शोगिनी टेक्नोक्रॅटस् दिमाखात उभी आहे. तिथे सिंगल, डबल व मल्टीलेअर पीसीबी चे उत्पादन होते. जवळजवळ ७०० ग्राहक असलेल्या या कंपनीच्या पुणे, नवी मुंबई, दिल्ली, गांधीनगर, बंगलोर व हैद्राबाद येथे शाखा आहेत. १००० च्या वर कामगार इथे काम करतात. कामगारांना सर्व सोयीसुविधा पुरविल्या जातात.श्री.आठवले यांच्या दोन कन्या व जावई तसेच कुटुंबातील इतर जवळजवळ ५० जण शोगिनी मध्ये कार्यरत आहेत. २००८ पासून एका नवीन युनिटची सुरुवात श्री. आठवले यांनी केली. या युनिटमधे सिंगल साइडेड पीसीबी बनवले जातात. शोगिनी मधे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्तम गुणवत्तेच्या मालाचं उत्पादन होतं. श्री. आठवले यांची शोगिनी टेक्नोक्रॅटस् ही आशिया खंडातील सर्वात मोठी पीसीबी उत्पादन करणारी कंपनी करण्याची मनिषा आहे.

श्री. आठवले यांना २००१ मधे जागतिक मराठी चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड इंडस्ट्रीचा पायोनिअर इंडस्ट्रियलिस्ट चा पुरस्कार मिळाला. १९९९–२००० मध्ये त्यांना टॅक्स सन्मान मिळाला. २००८ मधे सर्वोत्तम उद्योजक हा पुरस्कार मिळाला. या सर्वाबरोबर श्री आठवले यांचा सामाजिक कार्यात मोठा सहभाग असतो. माळेगाव ता. भोर येथे त्यांनी स्वतःची शाळा सुरू केली आहे. पुण्याच्या जोगेश्वरी मंदिराजवळ वेद पाठशाळा उभारण्यात त्यांचा मोठा सहभाग आहे.पौड रोडवरील वेद भवन उभे करण्यासही त्यांनी आर्थिक मदत केली आहे. अनाथाश्रमांना मदत करणे, जवळपासच्या खेडयांमधे पिण्याच्या पाण्याची सोय करणे व त्यांच्या सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमात सहभागी होणे अशा अनेक उपक्रमात श्री. आठवले यांचा सहभाग असतो.

## डॉ. अजित मराठे –

डॉ. अजित मराठे यांचा जन्म मुंबईचा. मुंबईतच ते लहानाचे मोठे झाले. सिव्हिल इंजिनियर झाल्यावर दोन वर्षे त्यांनी कोल्हापूर परिसरात सामाजिक कामांना वाहून घेतलं होतं. डॉ. अजित मराठे यांनी ब्रॅन्ड इक्विटी मॅनेजमेंट रियल इस्टेट इन एमएमआरडीए रिजन या विषयात पीएच.डी. मिळविली आहे.

डॉ. अजित मराठे यांना पहिल्यापासूनच व्यवसाय करण्याची इच्छा होती. १९९४ मधे त्यांनी आपल्या लहानपणापासूनच्या मित्राबरोबर निर्माण कन्स्ट्रक्शन ची सुरुवात केली. त्यांनी लहान लहान कॉन्ट्रॅक्टस् घ्यायला

सुरुवात केली. थोडयाच दिवसात ते बिल्डर आणि डेव्हलपर या आपल्या मुख्य व्यवसायाकडे वळले.

नेरळ येथे एका लहान बिल्डींगपासून त्यांनी या व्यवसायाला सुरुवात केली. दोन्ही भागिदारांच्या साहचर्यामुळे त्यांच्याकडे अनेक कामं येऊ लागली. मुंबईत मालाड, जोगेश्वरी, कांदिवली, महालक्ष्मी, मुलुंड येथे; तर मुंबई बाहेर नेरळ, महाड, माणगाव अशा अनेक ठिकाणी त्यांनी कामं केली. निर्माण कन्स्ट्रक्शन एन.आर.डी.एल. या नावाने सर्वांना परवडणारी घरं ते बांधतात.

अशा व्यस्त दिनक्रमातून डॉ. अजित मराठे आपली शिकवण्याची आवड जोपासतात. अनेक नवीन उद्योजकांना त्यांच्या शिकवण्याचा फायदा झाला आहे.

रियल इस्टेट डेव्हलपमेंटच्या क्षेत्रात निर्माण कन्स्ट्रक्शनला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत.

आपली सामाजिक जबाबदारी डॉ. अजित मराठे निर्माण फाऊंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून पूर्ण करतात. दरवर्षी असामान्य कर्तृत्व दाखवणाऱ्या व्यक्तिला निर्माण कृतज्ञता पुरस्कार दिला जातो.

### श्री. गिरीश टिळक ह्न

रेझ्युमे मॅनेजमेंट कन्सलटन्टस् प्रा.लि.

डोंबिवलीतील एका साध्या मध्यमवर्गीय घरात श्री.गिरीश टिळक यांचा जन्म झाला.मुंबईत शालेय व महाविद्यालयीन शिक्षण झालेले गिरीश, मटेरियल्स मॅनेजमेंट विषयातील पदवीधारक आहेत. हॉटेल कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, यूटिव्ही लिमिटेड, सिग्मा लॅबोरेटरीज लि. सारख्या मोठया कंपन्यांमधे काम करण्याचा १५ वर्षांचा अनुभव त्यांच्याकडे आहे.

१९९५ पासून श्री. टिळक, रेझ्युमे मॅनेजमेंट कन्सलटन्टस् प्रा.लि.चे डायरेक्टर आहेत. रिसोस मॅनेजमेंट सर्व्हिसेस मध्ये रेझ्युमेचे अग्रगण्य नाव आहे. डोंबिवलीमध्ये कॉर्पोरेट ऑफिस असणारी ही कंपनी एच.आर. सोल्युशन, हेडहंटिंग आणि एक्झिक्युटिव्ह सर्च या सेवा देते. श्री. गिरीश यांची हेडहंटिंग ची खासियत आहे. हेडहंटिंग म्हणजे वेगवेगळया कंपन्यांमधे लागणारी सुयोग्य व्यक्ति शोधून देणे.

गेल्या वीस वर्षात या सुयोग्य व्यक्तिंच्या शोधात श्री. गिरीश टिळक यांनी देशविदेशात दौरे केले आहेत. मॅन्युफॅक्चरिंग, वित्तीय सेवा, आरोग्य सेवा, अशा अनेक क्षेत्रातील कंपन्यांसाठी त्यांनी यशस्वीपणे काम केले आहे. त्यामधे स्वित्झर्लंडमधील बी.टी.एस. इन्व्हेसमेंट अॅडव्हायझर्स, क्रॉम्पटन ग्रीव्हज, केंब्रिज कन्सलटिंग, युके युएइ आणि भारतस्थित डी.एम् हेल्थकेअर इंडिया प्रा.लि., जी.ए. हेल्थकेअर अशा अनेक नामवंत कंपन्यांचा समावेश आहे.

श्री. गिरीश टिळक यांचा सामाजिक कामातही सक्रीय सहभाग असतो. मराठी माणसाला उद्योजकतेचा मंत्र देणाऱ्या ''सॅटरडे क्लब ग्लोबल ट्रस्ट'' या संस्थेचे ते माजी सचिव आहेत. याच संस्थेच्या अनेक उपक्रमांच्या कोअर कमिटीमध्ये त्यांनी काम केले आहे.

ऑगस्ट २०१० मधे राजहंस प्रकाशनाने श्री. गिरीश टिळक यांच्या हेडहंटींगच्या अनुभवांवर आधारित, प्रसिद्ध लेखक श्री. सुमेध वडावाला रिसबूड यांनी लिहिलेलं, ''हेडहंटर'' हे पुस्तक प्रकाशित केलं.या पुस्तकाच्या चार आवृत्त्या निघाल्या आहेत. २०१२ मध्ये त्यांना या पुस्तकासाठी कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार मिळाला. सप्टेंबर २०१२ मधे श्री. गिरीश टिळक यांना चित्तपावन उद्योजक मंच मुंबईचा ''उद्योग श्री'' हा पुरस्कार मिळाला. या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून श्री. गिरीश टिळक विद्यार्थ्यांसाठी, करियर प्लानिंग या विषयावर विविध शैक्षणिक संस्थांमधून व्याख्यानेही देतात. मैत्रेय फाऊंडेशन व दिव्य मराठी दैनिकाच्या माध्यमातून ते सध्या महाराष्ट्रात करियर प्लानिंग संदर्भात व्याख्याने देत आहेत.

**श्री संत सेवा संघ**

श्री संत सेवा संघाचे संस्थापक

सद्गुरु पू. श्री. संजय गुरूजी यांचे

**श्रीमद् भागवत महापुराण चिंतन**

शुक्रवार दि. १ ऑगस्ट ते गुरुवार दि. ७ ऑगस्ट २०१४

वेळ : सायं. ७.१५ ते ९.००

ठिकाण : **लक्षिका मंगल कार्यालय**

लवाटेनगर, सिटीसेंटर मॉलजवळ, नाशिक-२.

# चित्तपावन महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा)

दि. २८ जून रोजी शनिवारी चित्तपावन महिला मंडळ (स्नेहबंध मैत्रिणींचा) ची सभा झाली. त्यावेळी त्वचारोग तज्ञ डॉ. केतकी गोगटे यांनी मैत्रिणींना 'त्वचा व केसांची काळजी' ह्या विषयावर व्याख्यान दिले. चांगली त्वचा राखण्यासाठी कोणता, किती आहार घ्यावा, व्यायाम का करावा, ते समजून सांगितले. काही उदाहरणे देखील दिली. तसेच काही उपचार पद्धती (उदा. केमिकल पील, फिरल, बॉडी पॉलिशिंग, तारुण्य पिटीका) ह्या अनेकांना उपयोगी आहेत. त्या पद्धती शास्त्रमान्य व तशा अति महागड्या सुद्धा नाहीत. त्यांचा उगाच बाऊ करू नका. आवश्यकता असल्यास त्या करून घ्याव्या. सुंदर त्वचा असण्याचा अधिकार फक्त अभिनेत्रींना नाही, तर सर्वसामान्य महिलांना सुद्धा आहे, हे त्यांनी विशेष नमूद केले. मैत्रिणींनी विचारलेल्या प्रश्नांना, शंकांना त्यांनी योग्य उत्तरे दिली. ह्या प्रसंगी अनेक महिला उपस्थित होत्या. काही तांत्रिक कारणामुळे सदर कार्यक्रम 'राणी भवन' येथील हॉलमध्ये संपन्न झाला.

या महिन्यातील मासिक सभा दि. २६ जुलै, शनिवारी सायं. ५ वा. काका गद्रे मंगल कार्यालयात होईल. यावेळी डॉ. मीना बापये यांचे 'चष्मा नको' ह्या विषयावर व्याख्यान होणार आहे. तरी मैत्रिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

**– मैथिली गोखले**

---

# स्नेह वानप्रस्थाश्रम

तो क्षण प्रत्येकाच्या आयुष्यात येतोच, त्या संध्याकाळी कोणी हात देण्यास पुढे येत नाही, काही अपरिहार्य कारणांमुळे जवळचे लांब लांब जाऊ लागतात, एकाकीपण खायला उठते आणि सोबत येतो तो आधार, काठी बनून 'स्नेह' च्या रुपात.

हवे तसे मनमोकळं जगण्यासाठी, समवयस्क मंडळींशी गप्पा मैफल जमविण्यासाठी, छोटासा खेळ रंगण्यासाठी, जेवणाची, औषधाची वेळ न चुकण्यासाठी आणि स्वच्छ सुंदर जीवन जगण्यासाठी, पुणे जिल्ह्यातल्या राजगुरुनगर येथे सुरू होत आहे अशीच एक मायेची सावली.

'स्नेह' प्रत्येकाच्या आयुष्यात आलेलं दुसरे बालपण, उर्वरीत जीवन आनंददायक व्हावे या सद्हेतूने व सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतूनच श्री. दिलीप पटवर्धन यांनी 'स्नेह' या वानप्रस्थाश्रमाची निर्मिती केली.

निसर्गरम्य व शांत वातावरण, स्वच्छ व शुद्ध हवा, पाणी, सर्व आवश्यक सुविधांनी युक्त ॲटॅच टॉयलेटसह ६ रुम्स, एका रुममध्ये २ व्यक्तींची सोय, कॉमन हॉल, डायनिंग, गेस्ट रुम, अद्यावत किचन, छोटेसे गार्डन याशिवाय जवळच हॉस्पिटल, मंदिर अशा सर्व सोयींयुक्त 'स्नेह' आपल्या जवळच्या, ओळखीतल्यांसाठी हक्काने सांगता येईल असं.

ध्रुव, भिमाशंकर सोसायटी, वाडा रोड, राजगुरुनगर (खेड), जि. पुणे.

अधिक माहितीसाठी संपर्क –

शरद सोनटक्के : ९८२३२६५१३८

संजोग पानसरे : ९९२२९७६९५०

दिलीप पटवर्धन : ९४२०१६०८९९

---

# सौ. संध्या केळकर यांच्या चित्रांचे प्रदर्शन

आपल्या संस्थेच्या सभासद सौ. संध्या केळकर यांच्या चित्रांचे प्रदर्शन दि. २९ जुलै ते ४ ऑगस्ट या कालावधीत वरळीच्या नेहरु सेंटर कलादालनात आयोजित केले आहे. गेली तीन चार वर्षे संस्थेच्या अष्टमीच्या देवीचा रेखीव मुखवटा करण्याच्या निमित्ताने सौ. संध्या केळकरांचा कलाविष्कार सर्वांच्या परिचयाचा आहेच.

या प्रदर्शनात सौ. केळकर यांनी कॅनव्हासवर तैलरंगांनी निसर्गाची विविध रुपे साकारली आहेत. तसेच पेनच्या साहाय्याने विविध ऐतिहासिक वस्तूंची रेखाचित्रे पण प्रदर्शनात बघावयास मिळणार आहेत. सभासदांनी प्रदर्शनाला जरूर भेट द्यावी.

प्रदर्शनासाठी सौ. केळकर यांना संस्थेतर्फे शुभेच्छा.

# भीष्मराज बाम

नासिक आणि चित्तपावन संघाला अतिशय अभिमान वाटावा अशी घटना मागच्या काही दिवसांमध्ये घडली आहे. श्री. भीष्मराज बाम यांना महाराष्ट्र शासनाने त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील आजवरच्या कार्याबद्दल जीवन गौरव पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. श्री. बामसाहेब नाशिककर आहेत आणि आपल्या संस्थेशी संबंधित आहेत याचा आपल्या सर्वांना रास्त अभिमान वाटतो आहे. श्री. बाम हे महाराष्ट्र पोलिस सेवेतून महासंचालक पदावरुन सेवा निवृत्त झाले. आपल्या पोलिस खात्यातील सेवा काळात अनेक महत्त्वाच्या आणि कठीण प्रकरणांच्या तपासात त्यांनी महत्त्वाचे काम केलेले होते. महाराष्ट्रातच नव्हे तर दिल्लीलादेखील केंद्र शासनाच्या अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या होत्या. बामसाहेबांचे पोलिस खात्यामधील काम महत्त्वाचे होतेच पण त्यापेक्षा कितीतरी मोठे काम त्यांनी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर केलेले आहे. क्रीडामानसशास्त्र ह्या एका नव्या विषयात त्यांनी केलेले कार्य अनेकांना प्रेरणादायी ठरले. खेळात खेळाडूंचे क्रीडा विषयक कौशल्य जितके महत्त्वाचे असते तितकेच किंबहुना त्यापेक्षाही जास्त महत्त्वाची ठरते ती त्यांची मानसिकता. योग्य मानसिकता बाळगणारे खेळाडू इतरांपेक्षा उजवे ठरतात आणि प्रसंगी कसोटीच्या क्षणीही योग्य कामगिरी करु शकतात. बामसाहेबांनी आपल्या मार्गदर्शनाने हा विश्वास अनेक खेळाडूंना दिला. त्यांच्याकडून मार्गदर्शन घेऊन यशाची शिखरे गाठणाऱ्या खेळाडूंची नुसती यादी जरी पाहिली तरी भारतातले कितीतरी अव्वल खेळाडू आपल्याला त्यात दिसतील. सचिन तेंडूलकर, राहूल द्रवीड, अंजली भागवत, जसपाल राणा, गीत सेठी, गोपीचंद, अपर्णा पोपट, कमलेश मेहता, वीरधवल खाडे, कविता राऊत, अंजली ठमके अशा अनेकांना त्यांच्या कारकीर्दीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर बामसाहेबांचा परिसस्पर्श झाला होता. त्यांची स्वत:ची पुरुषोत्तम ॲकेडमी, पुण्याचे चाणक्य मंडल आदि संस्थांशी ते जवळून संबंधित आहेत. एक उत्तम लेखक म्हणूनही त्यांचा लौकिक आहे. मनासज्जना, मार्ग यशाचा, आदि त्यांची पुस्तके अनेकांना प्रेरणादायी ठरलेली आहेत. पू. पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय परिवारातही ते महत्त्वाचे काम करीत आहेत. बाबा आमटे, पु.ल. देशपांडे आदि महान व्यक्तिमत्वांचा निकटचा सहवास त्यांना लाभलेला आहे. अतिशय प्रसन्न आणि हसतमुख व्यक्तिमत्व असणाऱ्या बाम साहेबांच्या निकट गेल्यावर त्यांचे मोठेपण जाणवते पण ते अंगावर येत नाही, खरी मोठी माणसे अतिशय साधी, प्रांजल आणि विनम्र असतात हे बामसाहेबांकडे पाहिल्यावर लक्षात येऊ शकेल. आजही बामसाहेब असंख्य लहानमोठ्या खेळाडूंना आपले मार्गदर्शन करीत असतात. अशा क्रीडापटूंसाठी... नव्हे, मनाची उभारी घालवून बसणाऱ्या आणि पुन्हा नवा आत्मविश्वास मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या प्रत्येकासाठीच बामसाहेबांच्या घराचे दरवाजे नेहमीच उघडे राहिलेले आहेत. बामसाहेबांचा शासनाने गौरव केला हे कदाचित शासनाने खूप उशीराने उचललेले योग्य पाऊल असेल. बामसाहेबांना आपण सर्वार्थाने आपले म्हणू शकतो. म्हणूनच त्यांच्या गौरवाचा आनंद आणि रास्त अभिमानही. त्यांचे अभिनंदन... !!

**निवासी, व्यापारी, औद्योगिक संकुल बांधकाम, प्लॉट डेव्हलपमेंट यातील विश्वसनीय नाव**

**मिहिर कन्स्ट्रक्शन**

**सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर**

**ऑफिस** : २, प्रसाद रेसिडेन्सी, माणेक्शा नगर, रत्नपारखी हॉस्पिटलजवळ, द्वारका, नाशिक. फोन : २५९०७५४

**ईमेल :** cvranade@gmail.com

**सी. व्ही. रानडे,** बी.ई. (सिव्हिल)

**मोबाईल** : ०९४२२२४६८७८

# * अभिनंदन *



आपल्या संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य **श्री. नितीन सहस्त्रबुद्धे** यांची श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्थेत उपाध्यक्षपदी निवड झाली. संस्थेतर्फे हार्दिक अभिनंदन.

---



आपल्या संस्थेचे आजीव सभासद **श्री. विद्याधर वामन फडके** यांनी २१ डिसेंबर २०१३ रोजी उत्तरायणाचा मुहुर्त साधून पायी नर्मदा परिक्रमा करण्यास सुरुवात केली. ती परिक्रमा १५ मे रोजी नर्मदामाईने पूर्ण करून घेतली. परिक्रमेमध्ये त्यांनी नर्मदा काठच्या परिसरातील तेथील वातावरणातील खूप फोटो काढले आहेत. त्यातून तेथील रस्त्याबद्दल माहिती मिळू शकते. संपर्क – मो. ९८२२११४८१७

---




**आदित्य अशोक डोंगरे**
एस.एस.सी. परीक्षेत ९०.२०% गुण मिळवून उत्तीर्ण

---



**कु. श्रुती किशोर जोग**
एस.एस.सी. परीक्षेत ९२.६०% गुण मिळवून उत्तीर्ण



स्वा. सावरकर मध्यवर्ती राष्ट्रीय प्रबोधन संस्था भगूर यांच्या वतीने स्वा. सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त भगूर येथे अष्टभूजा देवीची पालखी व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत नाशिक येथील अभिनव भारत मंदिर ते भगूर अशी युवकांची बाईक रॅली काढण्यात आली. स्वा. सावरकरांच्या स्वप्नातील विज्ञानवादी हिंदूराष्ट्र निर्माण व्हावे, या स्वप्नपूर्तीसाठी झटणाऱ्या युवकांना एकत्र करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या बाईक रॅलीचे नियोजन आपल्या संस्थेच्या युवक मंडळातील **प्रसाद धोपावकर** यांनी केले. रॅली संदर्भातील सर्व शासकीय परवानग्या व इतर कामकाज उत्कृष्टपणे केल्याबद्दल त्याचा प्रा. रमाकांत देशपांडे, वर्धा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यास श्री. सतीश भावे यांचे मार्गदर्शन व सहाय्य लाभले. या कार्यक्रमात पतितपावन मंदिर रत्नागिरी, सावरकर दर्शन प्रतिष्ठान रत्नागिरी, कर्नाळ ट्रस्ट पुणे, सावरकर विचारमंच यवतमाळ, सावरकर स्मृती मंडळ बडोदा इत्यादी संस्था सहभागी झाल्या होत्या.

**प्रसाद धोपावकर** यास संस्थेतर्फे शुभेच्छा आणि हार्दिक अभिनंदन !

***चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे सर्वांना शुभेच्छा व हार्दिक अभिनंदन !***

# ✻ भावपूर्ण श्रद्धांजली ✻



**कै. अविनाश पु. आघारकर**

एक विलक्षण उमदे व्यक्तिमत्व! नासिकच्या क्रिकेटच्या इतिहास ज्यांच्याशिवाय पूर्णच होऊ शकत नाही असे ! नासिक क्रिकेट असोसिएशनचे कोच, स्वतः रणजी क्रिकेटर असलेले, ज्यांनी क्रिकेटमध्ये अनेकांना घडविले आणि आपली पत्नी अदिती हिच्या कलागुणांना सतत प्रोत्साहित केले. त्या द्वारका हास्ययोग क्लबच्या उपाध्यक्षा आणि चित्तपावन महिला मंडळाच्या कार्यकर्त्या अदिती आघारकर यांचे पती अविनाश आघारकर यांचे दि. १९/३/२०१४ रोजी दुःखद निधन झाले. यावर अजूनही विश्वास बसत नाही. नाशिक महिला क्रिकेट संघाचे संस्थापक असलेले आघारकर यांनी पदरमोड करीत नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागात जाऊन मुलींचा शोध घेऊन अनेक गुणी मुलींना उज्वल क्रिकेटचे भवितव्य दिले. त्यांचे पुत्र रणजी क्रिकेटर सलील आघारकर त्यांच्याच मुशीतून घडले आहेत. आपल्या सामाजिक कार्याची आवड आघारकरांनी घरातील प्रत्येकात रुजविली. त्यांच्या जाण्याने क्रिकेट जगताची झालेली हानी कधीही भरून न येणारी आहे.

---




चित्तपावन मंगल कार्यालयाचे माजी व्यवस्थापक आणि संस्थेचे सभासद श्री. दिनकर कानिटकर यांच्या सुविद्य पत्नी **सौ. उषा दिनकर कानिटकर** ह्यांचे नुकतेच वयाच्या ७६ व्या वर्षी दुःखद निधन झाले. ईश्वर मृतात्म्यास शांती देवो. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.



आपल्या संस्थेचे देणगीदार पुणे येथे वास्तव्यास असणारे **श्री. महादेव (शरद) नारायण साने** यांचे पुणे येथे दि. २९-४-२०१४ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी दुःखद निधन झाले. कै. नारायण चिंतामण साने राहणार इंदिरानगर, नाशिक यांचे ते सुपुत्र होते. बँक ऑफ बरोडामध्ये ते पुणे, लोणावळा, मुंबई, नाशिक व सोलापूर इ. ठिकाणी ३८ वर्ष कार्यरत होते.

त्यांच्या मागे पत्नी दोन मुले, मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्री. विजय साने यांचे ते काका होते. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

---



आपल्या संस्थेचे आजीव सदस्य व 'एम.जी. वाटवे ग्लास मर्चंट' अशी मोडी लिपीत पाटी असलेल्या नाशिकमधील एकमेव संस्थेचे एक संचालक **श्री. लक्ष्मण (निशिकांत) महादेव वाटवे उर्फ अण्णा वाटवे** यांचे वयाच्या ७० व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय आणि मोठा मित्र परिवार आहे. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

---



आपल्या संस्थेच्या सभासद **श्रीमती जानकीमंगल रघुनाथ बिवलकर** यांना दि. १९/४/२०१४ रोजी देवाज्ञा झाली. त्यांचे मागे मुलगा, मुलगी, सून नातवंड असा परिवार आहे. संस्थेतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## चित्तपावन ब्राह्मण संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वर यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| १०२ | अनुराग अजित गद्रे<br>गद्रे वाडा, गांधी चौक, टिमरनी, जि. हरदा (म.प्र.) ४६१२२८.<br>फोन : ०७५७३-२३००४५, मो. ०९००९५५६८५३ | २-११-८६ | कौशिक | ५.७ | बी.एस्सी. (इले)<br>एमबीए (मार्केटिंग) | ६२,५००<br>(मासिक) |
| १०३ | पराग सुरेश मित्रगोत्री<br>श्री गुरुदेव रेसिडेंसी, १ ला मजला, फ्लॅट नं. ए/४, रिलायन्स<br>पेट्रोल पंप समोर, मेरी-दिंडोरी रोड, नाशिक. मो. ९८६००३०२९४ | २-३-८४ | मित्रयुव | ५.६ | बी.ई. (मेकॅनिकल) | ३५,०००<br>(मासिक) |
| १०४ | अभिजित अनिल भावे<br>१२, शिवनेरी, ३ आशर इस्टेट, उपनगर, नाशिक-पुणे रोड,<br>नाशिक-१०१. फोन : २४१५७१०, मो. ९९७५३६९५५८ | २-७-८६ | कौशिक | ५.७ | बी.कॉम.,एमबीए(फाय)<br>डिप्लो. कॉम्प्युटर<br>हार्ड. सॉफ्टवेअर | २.५७ लाख<br>(वार्षिक) |
| १०५ | गणेश नारायण रानडे<br>१२, शिवनेरी, ३ आशर इस्टेट, उपनगर, नाशिक-पुणे रोड,<br>नाशिक-१०१. फोन : २४१५७१०, मो. ९९७५३६९५५८ | २२-७-७५ | भरद्वाज | ५.६ | बी.कॉम.,एमबीए(मार्के) | १४,०००<br>(मासिक) |
| १०६ | अमेय अनंत घाणेकर<br>सरोद, ए-१, पहिला मजला, नादब्रह्म सोसा., वारजे, पुणे-५८<br>मो. ९८२२१५२९७५ | ७-१०-८२ | गार्ग्य | ५.८ | बी.कॉम. | १५,०००<br>(मासिक) |
| १०७ | ऋषिकेश अरूण टिळक<br>१५ ब, भावसार कॉलनी, अपूर्वा हॉस्पिटल शेजारी, जमनागिरी रोड,<br>धुळे-१. फोन : ०२५६२-२४६२६०, मो. ९४२२७५११५६० | ४-१२-८६ | शांडिल्य | ५.११ | बी.एस्सी (फिजिक्स) | ८३,०००<br>(मासिक) |
| १०८ | ओंकार जयंत मालशे<br>बी ३०२, ऋध्दी-सिद्धी हौ.सो., न्यु एम.एच.बी. कॉलनी, गोराई रोड,<br>बोरीवली (प), मुंबई-९१. मो. ९५९४३४०२१८, ९५९४३४०२७२ | १५-८-८७ | वत्स | ५.८ | बी.एस्सी. | ३०,०००<br>(मासिक) |
| १०९ | सचिन अशोक तोरणेकर<br>ए-५, शिवनारायण रो-हाऊस, शिवरामनगर, जेलरोड, नाशिकरोड<br>मो. ९३७०४१२२२१ | १२-४-८४ | शामसूत | ५.१० | बी.कॉम., एलआयसी<br>हौ.फा. व्यवसाय | ४०-५०,०००<br>(मासिक) |
| ११० | पंकज महादेव मोडक<br>घ.नं. १२, औदुंबर छाया, आत्मविश्वास हौ.सो., चार्वाक चौक,<br>इंदिरानगर, नाशिक-९. फोन : २३२०४३१, मो. ९८२२८९९३११ | ११-२-८६ | वशिष्ठ | ५.३ | बी.कॉम. | २२,०००<br>(मासिक) |
| १११ | पुष्कर महादेव मोडक<br>घ.नं. १२, औदुंबर छाया, आत्मविश्वास हौ.सो., चार्वाक चौक,<br>इंदिरानगर, नाशिक-९. फोन : २३२०४३१, मो. ९८२२८९९३११ | २-१२-८२ | वशिष्ठ | ५.५ | आय.टी.आय.<br>स्वतःचा व्यवसाय | १५,०००<br>(मासिक) |
| ११२ | प्रसन्न वासुदेव जोशी<br>१५, राजेश्वर स्टेट बँक कॉलनी, गोरक्षण मार्ग, अकोला-४४४००४<br>फोन : ०७२४-३२०९३२२ | १२-३-८७ | शांडिल्य | ५.८ | बी.ई. (मेकॅ) | ४५,०००<br>(मासिक) |
| ११३ | हर्षद माधव दाते<br>३७१-ब, कस्तुरी सोसा., शनिवार पेठ, पुणे-३०,<br>मो. ८१०८१८०१२२ | ११-१-८८ | वशिष्ठ | ५.७ | बी.ई. (मेकॅ) | ३५,०००<br>(मासिक) |
| ११४ | रोहित श्रीराम रास्ते<br>१४२१, ओम एकता सोसा., थत्ते हॉस्पिटल जवळ, शुक्रवार पेठ,<br>पुणे-२. मो. ९७६६६०६१२०. फोन : ०२०-२४४३०६१४ | २७-९-७८ | कौशिक | ५.५ | बी.ई. (सिव्हील) | १० लाख<br>(वार्षिक) |

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ११५ | समीर सुनिल लिमये<br>एन ३३ एल ८७ १/२, सह्याद्रीनगर, सिडको, नाशिक-९.<br>मो. ९०११०८७६५७. फोन : ०२५३-२३९४३१२ | ७-११-८४ | कपिल | ६.२ | एमबीए (फाय.) | ४०,००० (मासिक) |
| ११६ | कौस्तुभ सुरेश देशपांडे<br>दुसरा मजला, विश्राम बाग अपार्टमेंट, आरती डिस्ट्रीब्युटर समोर, मेनरोड, नाशिक-१. मो. ९८९०६०४९५० | १०-४-७९ | कौंडिण्य | ५.७ | बी.कॉम. | १५,००० (मासिक) |
| ११७ | आदित्य सुधीर साठे<br>ए-१२, जलविहार कॉलनी, एन.आय.टी. ले लाऊट, हिंगणा रोड, नागपूर-३६. फोन : ०७१२-२२३०१३८, मो. ९७६६४६२३६० | १५-८-८६ | वशिष्ठ | ५.५ | बी.ई. (कॉम्प्यु) एम.बी.ए. | ५०,००० (मासिक) |
| ११८ | प्रसाद सुरेश चौधरी<br>७ प्रिती पुजन, पुष्प अपार्टमेंट, कामटवाडे, नाशिक-८.<br>मो. ९८२२०६०१९५ | ३०-११-८० | गौतम | ५.१० | बी.कॉम., एमबीए | ४५००० (मासिक) |
| ११९ | निनाद गोपाळ मनोहर<br>यशराज पार्क बि.नं. ३, फ्लॅट नं. ३, अभियंतानगर, कामटवाडे, नाशिक-१०. फोन : २३७२४६२, मो. ९८८१४०८१६७ | २७-१-८४ | भारद्वाज | ५.७ | बी.कॉम. आय.टी.आय. | २५,००० (मासिक) |
| १२० | प्रसाद धनंजय काळे<br>यशोदा बंगला, एच.डी. एटीएम समोर, शरणपुर रोड, नाशिक-२.<br>मो. ७५०७०५२७३७ | २८-११-८६ | गार्ग्य | ५.३ | एम.कॉम., डी.एम. | १५,००० (मासिक) |


## - ईशान्य भारत -

*आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, नागालँड, त्रिपुरा येथील महत्त्वाची प्रेक्षणीय स्थळे. श्री परशुराम कुंड, माझोली बेट, काझीरंगा अभयारण्य नैसर्गिक आश्चर्य - वडाच्या पारंब्या एकमेकात मिसळून बनलेले पूल, नामेरी पक्षी अभयारण्य इ.*

**२५ ऑक्टोबर २०१४ ते ९ नोव्हेंबर २०१४**

● संपर्क ●

**श्रीमती चित्रा हेमंत खरे**

मेहेंदळे गॅरेज जवळ, पुणे - ४.

मो. नं. ९६८९९४७१७९

**सौ. पुष्पा देशमुख** - ९३७१२२६८८८

## अनोखी कोकण सहल

*अश्मयुगीन गुहा, दगडी हत्यारे, कर्णेश्वर, बामणघळ, मार्लेश्वर, जयगडचे लाईट हाऊस, गणपती पुळे, पावस हेदवी वेळणेश्वर, डेरवण शिवसृष्टी इ.*

**१५ जणांचा ग्रुप असावा.**

**५ दिवसांची ट्रिप होऊ शकेल.**

● संपर्क ●

**श्रीमती चित्रा हेमंत खरे - ९६८९९४७१७९**

**सौ. पुष्पा देशमुख - ९३७१२२६८८८**

*पुरणपोळया, उकडीचे मोदक करून दिले जातील.*

# चित्तपावन ब्राह्मण संघ - वधू यादी

| अ.नं. | नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | स्वप्नजा विनोद मराठे<br>द्वारा विनोद अरूण मराठे, दै. हिंदुस्थान, खापर्डे बगिचा, अमरावती<br>फोन : ०७२१–२६६३६०८, मो. ९३७२८६३६०८ | १६–१२–८९ | कपि | ५.२ | बी.एस्सी., एम.जे. | १५००० (मासिक) |
| ३६ | वैजयंती जयंत भट<br>१०१, ग्रीन वुडस् अपार्ट., पारिजातनगर, डॉ. मुंजे मार्ग, नाशिक–५.<br>मो. ९६८९७३९४४६ | २८–११–९० | काश्यप | ५.५ | बी.कॉम., एम.पी.एम. डी.एल.डब्ल्यू. | १५,००० (मासिक) |
| ३७ | गौरी मधुकर रानडे<br>गिरीजा प्रसाद, फडकेनगर, डाबकी रोड, अकोला (विदर्भ)–२.<br>मो. ८८८८५२२३०४, ९८२३१२२३९४ | ४–७–९१ | भारद्वाज | ५.२ | सी.ए. | |
| ३८ | विनया राजन कुलकर्णी<br>५, प्रशांतनगर, पाथर्डी फाटा, सेल्स टॅक्स ऑफिस रोड, हॉटेल<br>बंधु राज मागे, नाशिक–१०. मो. ९८५००७८१७५ | १–६–९२ | पाराशर | ५.१ | १२ वी सायन्स<br>बीएसएल,<br>एलएलबी ॲपीयर | |
| ३९ | वेदांती अद्वैत दवणे<br>प्लॉट. नं. २, तळेश्वर कॉलनी, मकबरा रोड, बेगमपुरा, औरंगाबाद–४<br>मो. (आई) ९७६३२२७३०५, (वडील?) ९८६७०४३८०८ | २०–३–८९ | भारद्वाज | ५.४ | बी.एस्सी, आय.टी.<br>एमबीए (एचआर) | ८००० (मासिक) |
| ४० | पूजा अरूण मुळे<br>१२, लिगसी अपार्ट, वैभव कॉलनी, स्प्लेंडर हॉल मागे, राजीवनगर,<br>नाशिक–९. मो. ९२२५६२८७२८, ८६००२८७६१७ | २४–१० | | | | |
| ४१ | हीना उदय विश्वरुप<br>प्लॉट नं. १, चेतनानगर, राणेनगर, कैवल्य अपा., नाशिक–९.<br>मो. ७३८७००२१९२ | ६–८–८८ | काश्यप | ५.२ | बी.ई. (कॉम्प्यु) | ५०००० (मासिक) |
| ४२ | मानसी श्रीकृष्ण जोशी<br>द्वारा ३५३/१, प्लॉट नं. १०, शिवम कॉलनी, गडकर आळी,<br>शाहुपुरी, सातारा–२. मो. ८८०६००३३७६, ८८०६००४१२१ | ९–३–८९ | शांडिल्य | ५.२ | बीबीए<br>एमबीए (फायनान्स) | ५००० (मासिक) |
| ४३ | मधुरा आशुतोष करमरकर<br>जिल्हा न्यायालय आवार, जालना–४२३३०१.<br>फोन : ०२४८२–२२४८११, मो. ८८८८८१०९८१ | २७–१०–९० | काश्यप | ५.१ | बी.ई. (इले. ॲण्ड टेलिकॉम) | २७,००० (मासिक) |
| ४४ | अमृता सुभाष लेले<br>फ्लॅट बी, रेवतीकुंज नेर्लिकर हॉस्पिटल जवळ, गंगापूर रोड, नाशिक<br>फोन : ०२५३–२३४७२४७, मो. ९९६०११३५४७ | १३–१२–८९ | काश्यप | ४.१० | एम.एस्सी.<br>टेक्सटाईल | १०,००० (मासिक) |
| ४५ | प्रियंका रामचंद्र रानडे<br>एन ४१ ए–एफ २–२४–५, साईबाबानगर, सिडको, नाशिक.<br>फोन : २३९०७६७, मो. ९८२२३६७७६१ | ३०–१२–९४ | भारद्वाज | ५.४ | एफवायबीकॉम<br>चालू | |
| ४६ | प्राजक्ता प्रमोद पेठकर<br>द्वारा प्रकाश होमिओ, शॉप नं. ४ बी, मानस आर्केड, पंचवटी<br>कारंजा, नाशिक–३. मो. ९८९०१४५२१९ | १६–१२–८९ | हरितस्य | ५.१ | एम.फार्मसी<br>(डिस्टिं) | |
| ४७ | नेहा सुधीर ठोसर<br>प्लॉट नं. ७० ई, पॅराडाईज हौ. सो., सोनेगाव, नागपूर–२२.<br>फोन : ०७१२–२०४०९०८, मो. ९४२२६४३७१८ | २८–३–९१ | काश्यप | ५.५ | एम.ए. (इं.)<br>फायनल | |






चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेचा हा अंक प्रकाशक, संपादक प्रा. दिलीप फडके यांनी मीरा एंटरप्राईजेस्, २, जयश्री अपार्टमेंट, ठाकरे बंगला, गंगापूर रोड, नाशिक–२ येथे छापून काका गद्रे मंगल कार्यालय, गोळेकॉलनी, नाशिक – ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**फोन – चित्तपावन : २५०११०७,गद्रे मंगल कार्यालय : २५७६२४१**


प्रति, ____________________

____________________

____________________


**संस्थेची वेबसाईट :–**

- Website : www.nasikchitpavan.org
- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http:\\twitter.com\nasikchitpavan
- http:\\facebook.com\nasikchitpavan
- http:\\youtube.com\user\nasikchitpavan



या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. चित्तपावन मित्र च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.